# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१२४** **दिनांक - २९/०३/२०२४**

**वेश्याव्यवसायकरीता अल्पवयीन मुली पुरविण्यास आलेल्या महिला वेश्यादलालावर छापा करवाई करुन ०१ अल्पवयीन व ०२ प्रौढ पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर पथकास यश.**

दिनांक २८/०३/२०२४ रोजी बातमीदारकडून महिला वेश्यादलाल नामे नगमा खान हि वेश्याव्यवसाय करीत असुन ती व्हॉटसअ‍ॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना अल्पवयीन व प्रौढ मुलींचे फोटो पाठवुन, वेश्यागमनासाठी अल्पवयीन व प्रौढ मुली पुरवीते, अशी गोपनीय माहिति मिळाली.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन महिला वेश्यादलाल नजमा उर्फ जसप्रित उर्फ नीलम सांशी हिने सांगितल्याप्रमाणे अ‍ॅक्वा फॅमिली रेस्ट्रो बार, निरा कॉम्पलेक्स, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १४.०० वा. छापा टाकला असता, महिला वेश्यादलाल १) श्रीमती नगमा उर्फ जसप्रित उर्फ निलम अजीतकुमार सांशी, वय २६ वर्षे हिने ०१ अल्पवयीन मुलगी व ०२ प्रौढ मुलींना पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरीता पुरविण्यासाठी प्रवृत्त केल्याने तिस सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०२ प्रौढ पिडित असे एकुण ०३ मुलींची सुटका केली आहे. सदर बाबत सफौ/उमेश हरी पाटील यांनी ताब्यातील महिला आरोपी वेश्यादलाल श्रीमती नगमा उर्फ जसप्रित उर्फ निलम अजीतकुमार सांशी, वय २६ वर्षे हिचेविरुध्द सरकार तर्फे फिर्याद दिल्याने नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्रमांक I २०१/२०२४ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७०(३), ३७२ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७,१८ सह अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ चे कलम ८१,८७ प्रमाणे दिनांक २९/०३/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/राजु भोईर, पोहवा/०२०३२ किशोर पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, पोशि/१२११६ चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/०६१०६ सम्राट गावडे, मपोशि/१३०७६ अश्विनी भिलारे, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर व मपोशि/१३०६० आफरिन जुन्नेदी नेमणुक भरोसा सेल भाईंदर यांनी केली आहे.